


₹ 14.00 ISBN 98-81-237-4958-7

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# नीला मास्तरीण

गोदावरीश महापात्र

अनुवाद

ललिता रिसबूड

*नवसाक्षर साहित्यमाला*

# नीला मास्तरीण

**गोदावरीश महापात्र**

अनुवाद

**ललिता रिसबूड**

चित्रे

**मनीष वर्मा**

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

ISBN 978-81-237-4958-7
प्रथम प्रकाशन : 2007 *(शके* 1929)
पहिली आवृत्ती : 2013 *(शके* 1934)
मूळ © गोदावरीश महापात्र
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1997
Neel Masterni *(Marathi)*
**₹ 14.00**
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

ही कहाणी आहे तीन गावांचीच. पण येथील बातमीने मात्र आसपास पाच पंचवीस गावात खळबळ उडाली होती. झुंजूमुंजू होताच एका गावची पाखरे दुसऱ्या गावावरून उडत जात. आणि चारा टिपत तिसऱ्याच गावात. तिथे त्यांना कुणीही हटकत नसे. तीनही गावातील कावळे सारखीच कावकाव करत. एका गावची जनावरे दुसऱ्या वा तिसऱ्या गावात चरायला जात. एका गावची भटकी कुत्री कुठल्याही गावातील उकिरडे हुंगत. एखादे हाडूक मिळेल या आशेने हिंडत.

आता हे कावळे, जनावरे, कुत्री यांना कुणीही बोल लावीत नाही. परंतु या गावचे लोक तिकडे गेले, किंवा तिथून तिसरीकडे गेले की झालेच. कुणीही यावे

आणि काहीही बोलावे. उचलली जीभ की लावली टाळ्याला. काही जणांना वाटते, "या साऱ्याचे मूळ शिक्षणात आहे." तर कुणाला वाटते, "ना शिक्षणाचा



दोष, ना समाजाचा. हा सारा दोष आहे नीला मास्तरणीचा." निमगावच्या आसपास तीन गावात अशा कितीतरी वावड्या ऐकू येत.

आता ही नीला मास्तरीण आहे तरी कोण?

आज कपडे धुणारी नीला हीच कोणे एके काळी नीला मास्तरीण म्हणून ओळखली जात असे. ती जवळच प्राथमिक शाळेत शिकवत असे. शाळेतील मुलांना जणू ती आपली आईच वाटे. तिलाही मुलांचा फार लळा होता. लहानपणीच तिची आई देवाघरी गेली होती. त्यामुळे तिला आणि तिच्या लहान भावाला वडिलांनीच फार मायेने वाढविले होते.

आईविना पोरकी पोरे ती. आईच्या माघारी त्यांचा सांभाळ वडिलांवर येऊन पडला.यात मुलांचा सांभाळ करणे, लिहिणे-वाचणे शिकवणे, वळण लावणे, सगळेच आले. बहीणभाऊ गावातील शाळेतच शिकायला जात. धुळीने माखून दोघेजण सायंकाळी घरी येत. वडिलांना मुलांचे कोडकौतुक होते. मग काय! घरी येताच बाकीचा वेळ हसतखेळत कधीच निघून जाई.

मुलगी वयात येताच वडिलांनी मुलगा शोधला. थाटामाटात तिचे लगीन करून दिले. पण काय!

अंगाची अजून हळद निघाली नव्हती तोच ती विधवा झाली. सहा महिन्यातच ती माघारी परतली. परत भाऊ आणि वडिलांबरोबर राहू लागली. त्या काळी विधवा विवाह होत नसत.

वडिलांवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला. पण ते डगमगले नाहीत. त्यांनी मुलीला पुढे शिकवणे चालू ठेवले. ती शिवणटिपण शिकली. वाचू लागली. लिहायला शिकली. हिशोब-टिशोब बघू लागली. या काळातच गावात इतरही मुली शिकू लागल्या. बाया घराबाहेर निघू लागल्या. तिचे वडीलही या चळवळीत ओढले गेले. शेजारील गावात प्राथमिक शाळा होतीच. वडिलांनी मुलीला तिथे लावून दिले. तिथपासून तिचे नाव पडले "नीला मास्तरीण."

असेच दिवस जात होते. तिचे वडीलही देवाघरी गेले. आता तिला कुणाचाही आधार राहिला नाही. ती शेजारील गावात शिकवायला जाई. शाळा सुटली की घरी येई. मग भावाचे जेवणखाण करे. तिला मनोमन वाटे की आपला भाऊ नावारुपाला यावा. एक भला माणूस म्हणून ओळखला जावा. दोघेही भावंडे अशा रीतीने आईबापाविना आपले जीवन जगू लागली.



पण काळ कधीच कुणासाठी थांबत नाही. नीला फार काळ आपल्या भावाबरोबर राहू शकली नाही. ती जिथे शिकवत असे तेथील तरुणांची एक नाटकमंडळी होती. दशावतार, रामलीला, भरतभेट असे अनेक खेळ ही मंडळी करीत. या नाटकांबरोबर नीलाच्या जीवनातही नाटक सुरू झाले. नाटकमंडळीतील एका तरुणावर ती भाळली. त्याचे नाव मदनलाल. मदन दोन गावातील लोकांचे कपडे धुवीत असे. मदनच्या प्रेमात नीला मास्तरीण अगदी आकंठ बुडून गेली. तिची नोकरी सुटली. भावाची मायाही आटू लागली. तिने गावकऱ्यांचे बोलणे कानाआड केले. समाजाचे सारे नीतिनियम झुगारून लावले. आपले सारे मायापाश तोडून ती मदनबरोबर एका तिसऱ्याच गावी निघून गेली.

नीला मदनकडे राहायला आली. अवघा दोनच महिन्यांचा खेळ! मग दिवस फिरले. मदनची नाटकमंडळी बंद पडली. त्याला दारुचा नाद लागला. तिने वारंवार अडवले. पण काही उपयोग झाला नाही. आता घरात रोजची दैना सुरू झाली. कडोसरीला दमडीही नसायची. मग नीला मास्तरणीने मळक्या

कपड्यांचे गाठोडे उचलले आणि ते धुवायला ती तलावाकडे निघाली. लाज आणि अपमानाने तिची मान खाली गेली होती.



कपडे धुता धुता तिला जुने दिवस आठवत.

एके दिवशी तिच्या लहान भावाकडे भोजनसमारंभ होता. शेजारची धोबीण तिच्या वहिनीची अष्टपुत्रीची साडी धुवायला घेऊन आली होती. नीला तिला म्हणाली, "मी धुते गं मी धुते. माझ्या वहिनीची अष्टपुत्री मला दे. मी धुवून आणते." नीलाने ती साडी धुवून आणली खरी. पण तिने ती शेजारणीला परत केली नाही. अष्टपुत्रीसाठी निरोपावर निरोप आले. अष्टपुत्री मिळाली तरच ना घरात मंगलकार्याचा मुहूर्त होणार. पण अष्टपुत्री कोण परत देणार? ती तर नीलाकडे आहे. नीला म्हणाली, "भाऊ नाही आला तर मी देणारच नाही साडी."

येईल का भाऊ? भाऊ आला तरी तिला 'ताई' म्हणून हाक मारेल का? तिढा वाढतच चालला. तीनही गावात याचा गवगवा होऊ लागला. एका गावात तिचा जन्म झाला होता. दुसऱ्या गावात ती शिक्षिका होती. आणि शेवटी तिसरीकडे ती दोन्ही गावातील मळके कपडे धुवत होती.

इकडे घरात विचार करून करून भावाचे डोके पिकले. एके काळी ही माझी ताई होती. मग तिच्याकडे



जावे की नाही?

रात्रीचा एक प्रहर लोटला होता. हो नाही करता करता नकळतच कधीतरी तो एकदम बहिणीच्या दारात जाऊन उभा ठाकला. बाहेरुनच त्याने हाक दिली—"ताई!"

हातात छान धुवून घडी केलेली अष्टपुत्री घेऊन नीलाताई बाहेर आली. तिचे केस मोकळे सुटले होते. भरून आलेले डोळे आसवे गाळीत होते. नीला भावाला बिलगली.

ती म्हणाली, "मी इथे राहू लागले तर तूही आलास ना माझ्यापाठोपाठ? लोकांना काय वाटेल? अशाने तू पण कुळाला कलंक लावशील. जा. परत फीर. माघारी जा."

भाऊ तर परतला. त्याचा चेहरा फुलला होता. त्याने आपल्या घरातील उजेडात बघितले. कुणाचे आसू ओंजळीत टपटपले होते? कुठली मायेची ओढ आपली पावले खेचत होते? कुणाची ममता जीवाची इतकी घालमेल करीत होती?

कुणाच्या पश्चातापाच्या बोलांनी त्याला मनोमन हेलावले होते?

भावाच्या हातातील अष्टपुत्री नजरेस पडताच भोजनसमारंभाला आलेले सारे पाहुणे चकित झाले होते.



Printed at Tarang Printers, F-40, Site "C", Surajpur Industrial Area, Greater Noida (U.P.)